# देशाला आता गरज 'ब्ल्यू कॉलर्ड जॉब्स'ची!

''आपल्या देशाने गेल्या काही वर्षांत 'व्हाइट कॉलर जॉब्स' पाहिले आहेत. आता आपल्याला आर्थिक विकासाला गती द्यायची असेल, तर गरज आहे ती 'ब्ल्यू कॉलर जॉब्स'ची !... आणि उत्पादन क्षेत्राच्या हातभाराने हे चांगल्याप्रकारे घडू शकेल. देशात अलीकडे 'मेक इन इंडिया'ची जी हाक दिली गेली आहे, ती खरंतर 'मेकिंग ऑफ टुमॉरोज इंडिया'... अर्थात उद्याच्या भारताचे निर्माण, या अर्थाने घ्यायला हवी. उत्पादन क्षेत्र हेच उद्याचे आर्थिक आघाडीवर असणारे क्षेत्र असणार आहे,'' असे मत केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी येथे व्यक्त केले.

गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सने आयोजिलेल्या व्याख्यानाप्रसंगी प्रभू शनिवारी बोलत होते. 'भारतासाठीच्या कल्पना' (व्हिजन फॉर इंडिया) हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. या वेळी संस्थेचे संचालक डॉ. राजस परचुरे उपस्थित होते.

या वेळी प्रभू यांनी डिजिटल इंडिया आणि स्किलिंग इंडिया यांसोबत पायाभूत सुविधांची गरजही अधोरेखित केली. सुयोग्य गुंतवणूक, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, वेगवान विकास, समाजोपयोगी धोरणे आणि यासाठी आवश्यक असणारी पुरेशी इच्छाशक्ती, ही पंचसूत्री घेत... तसेच, अर्थशास्त्राच्या 'मॅक्रो इकॉनॉमिक्स' आणि 'मायक्रो इकॉनॉमिक्स' या शाखांची सांगड घालत विकासाची दिशा सुस्पष्ट होऊ शकेल, असेही ते म्हणाले.

**परकी गुंतवणूक आवश्यकच!**

सुरेश प्रभू म्हणाले, ''देश कसा घडावा, याबद्दलची मनातील सर्वंकष संकल्पना आणि त्याबरहुकूम होणारी प्रत्यक्ष कृती, याची सांगड घातली जाणे आवश्यक ठरते. देशाचा विकास वेगाने करण्यासाठी थेट परकी गुंतवणूक (एफडीआय) वाढवण्याचा पर्याय नक्कीच उपयुक्त आहे.''